# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक धोरण

**श्री. पंडित चंपतराव भोयर** (पी.एच.डी. संशोधक)एम.ई.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा.

---

प्रस्तावना -

२० व्या शतकापूर्वी शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण असल्या असल्यामुळे बोकारीची समस्या होती. या देशातील स्पृश्य हिंदू सत्तास्थानी होते. त्यामुळे अस्पृश्यांचे अपरिमित शोषण झाले. आर्थिक शोषन हे गुलामगीरीपेक्षा अती भयंकर आहे. पूर्वीचा कामगार वर्ग अशिक्षित व असंघटीत होता, त्यामुळे जमिनीवर हक्क मालकी होती. भांडवलदार देशावर वर्चस्व गाजवितात. त्यामुळे कामगार वर्गाची मानसिकता केवळ काम करणे, काम करण्यासाठीच आपला जन्म झालेला आहे, असा समज झाल्यामुळे श्रमिक वर्ग दुर्बल झाला हक्क व अधिकारापासून कोसोदूर राहिला. साधारणतः कामगार हा कारखान्यात काम करणारा वर्ग, शेतकरी शेतमजूर, गवंडी काम करणारा नोकरदार वर्ग अर्थाजणासाठी आर्थिक श्रम करायचा. त्यातून मिळणारा लाभ तुटपुंजा असायचा. त्याकाळात खोत हा गावातल्या प्रमुख सावकार. तो शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळू नये यासाठी आडकाठी आणायचा. कामगार वर्गाकडे स्वतःची जमीन नाही, व्यवसाय नाही, कोणता उद्योग धंदा नाही, म्हणून सर्वस्वी दुसऱ्यांच्या स्वतःचे शरीर स्वाधीन करणे असा समज रूढ झाला होता. एकप्रकारे वेठबिगारीची समस्या होती. डॉ. बाबसाहेब आंबेडकर प्रतिपादन करतात की, चातुर्वार्त्यांना अभीप्रेत असलेल्या श्रमविभागाची हि व्यक्तिगत आवडानिवडी किंवा अंगभूत कौशल्यावर नव्हती तर त्या व्यक्तीचा जन्म कोणत्या जातीत झाला आहे. यावर सर्वस्वी अवलंबून होती. परंतु देशाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी, भांडवलदारावर विश्वास ठेवून श्रम वेळेची पर्वा न करता मालकासाठी स्वतःचे प्राण देण्यासाठी मागेपुढे बघत नव्हता. पूर्वी दलित वर्ग हा कामगार असायचा, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांची सेवा करणे, मेलेली जनावरे ओढून विल्हेवाट लावणे, कातडी सोलणे, संडास साफ करणे, केलेल्या कामाचा मोबदला न देता मृत जनावरांचे मास खाण्यास प्रवृत्त करणे, उष्ट अन्न खायला देणे. हे सर्व अशिक्षित पणामुळे दलित वर्गाचा अतोनात छळ झाला. केवळ आमचे मायबाप म्हणजे, भांडवल शाही सावकारशाही यांनाच समजायचे, तर कामगारांनी मोठ्याने आवाज काढल्यावर त्यांना मारायचे, गावाबाहेर काढायचे, महिलांवर अन्याय करायचे प्रत्यक्ष गुलामगिरीत जीवन कंठायचे. कामगारांचे आश्रयस्थान म्हणजे गावाच्या बाहेर कुडाच्या भिंती, [पाल उभारणे, गवताची झोपडीत वास्तव्य असायचे बाह्य घडामोडीचे काही देणे घेणे नव्हते. म्हणून या पृथ्वीवर चमकता तारा, युगपुरुष प्रखर राष्ट्र भक्त उदयास आला तो म्हणजे डॉ. बाबसाहेब आंबेडकर...!कामगार वर्गाचे हित जोपासण्यासाठी शिक्षणाचा अधिकार मुलभूत हक्क व अधिकारासाठी बाबासाहेब १९३६ साली मजूर पक्ष काढला. त्यावेळी स्वतंत्र परिषदेत भारतीय दलित कामगारांचा आपल्या स्वतंत्र कामगार संघटना स्थापन करण्याचा संदेश दिला.

विषयाचे महत्व –

कामगारांचे सक्षमीकरण करायचे असेल तर कामगारांमध्ये आत्मनिर्भरपणा जागृत करणे आवश्यक आहे. त्याकरीता त्यांच्यात सामाजिकतेची जाणीव निर्माण झाली पाहिजे. सर्वांनी एकता, बंधुत्ववाद समानता या धर्मनिरपेक्षतेची जाणीव निर्माण व्हावयास पाहिजे. कामगारांना रोजगार निर्माण कार्नारे शिक्षण आवश्यक आहे. कसलाही भेदभाव नसावा, शोषण मुक्त समाज निर्माण होणे देश हितासाठी फायदेशीर ठरणार आहे. कामगारांना कामाच्या ठिकाणी मानवतेच्या दृष्टीकोनातून समान वागणूक मिळाली पाहिजे. कामगार वर्गाचा देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी मोलाचा वाट असतो, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, कामगारांना पुरुष अथवा स्त्री असो त्यांना पुरेशी विश्रांती मिळाली पाहिजे इतरही सुविधा मिळायला पाहिजे. भारतीय खाणीमध्ये भारतीय कामगारांना काम करण्यासाठी फारशी संधी दिली जात नसे. इंग्लंड मधून कामगार आयात केले जात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या आयती प्रतीबंध लावला. भारतातील कामगारांना खाणीमध्ये कामावर घेऊ लागले. २९ मार्च १८४५ ला स्त्री कामगारांना प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतूद केली. रोख मदत, किमान चार आठवडे प्रसूती भत्ता मिळावा. खाण कामगारांना शॉवर बाथची योजना अमलात आणली. यासाठी तरतूद केली. कुशल आणि अर्धकुशल कामगारांसाठी रोजगार विनिमय केंद्र स्थापन करण्यसाठी चालना दिली. कामगार व मालक यांचे सलोख्याचे मैत्रीचे नाते निर्माण व्हावेत यासाठी लेबर ऑफिसर्सची नियुक्ती करण्यासाठी निर्णय घेतला. स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक वर्चस्वामुळे वर्ण वर्चस्वाचा प्रश्न निर्माण झाला, त्यासाठी दुबळे देश सामर्थ्यवान झाले पाहिजेत कामगार संघटनांना युनियन म्हणून मान्यता देते. संघटना स्थापन करण्याचा सल्ला देतात स्त्री पुरुष दोघांमध्ये लिंगभेद न करता 'समान कामासाठी समान वेतन' प्रत्यक्ष संपूर्ण भारतात लागू केले. १५ सप्टेंबर १९३८ रोजी कामगारांना संपाचा अधिकार दिला.

**संशोधन पद्धती -**

भूतकाळातील घडलेल्या घटनांचा वर्तमान काळातील घटनांशी संबंधाची माहिती होईल भविष्य कालीन घटनांशी सत्यता पडताळून पाहता येते. भविष्यांचा वेध घेता येते. त्यासाठी. त्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला. म्हणून १९४२-१९४६ या काळात बाबासाहेब मजुरमंत्री असतांना सभासंमेलन, हिंदू कोड बिल यातून जनजागृती केली. श्रमाचे महत्व पटवून दिले, मोठ्या प्रमाणात जन जागृत केली व स्त्रियांना स्वाभिमानाने जगण्यास सूचित केले. की नोट - अर्थाजन, खोत, वेठबिगारी, चातुर्वर्णीय, धर्मनिरपेक्षता, शॉवर बाथ, लेबर ऑफिसर्स, व्हाईसरॉय कॉन्सील, सेवायोजन कार्यालय, यांत्रिकीकरण, ट्रेड डिस्प्युट बिल, निर्बुद्ध, Educate, Agitate and Organise, अमेंडमेंट, ऑर्डीनंस.

कार्यात्मक व्याख्या -

कामगार :- "अर्थाजनाशी संबंधित विविध क्षेत्रात आपले शारीरिक श्रम विकून त्या बदल्यात पैश्याच्या स्वरुपात मोबदला मिळणारी व्यक्ती होय"

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार विषयक दृष्टीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबसाहेब आंबेडकर म्हणाले की, भारतात कुठल्याही प्रकारचा भेदभाव नसावा, सर्वांना मुलभूत हक्क प्रदान व्हावे. देशातील युवक हा प्रगतीशील असावा कामगार वर्गाचे सक्षमीकरण झाले पाहिजे यासाठी तो शिक्षित असावा. उदारमतवादी धोरण घेतले. - माल कामगार तंटामुक्त निवारण कायदा १९३७-१९४५ पारित केला डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९४२ मध्ये व्हाईसरॉय कन्सीलचे सदस्य होते. कामगार मंत्री असतांनाच कामगारांचे हित रक्षण आणि कायदे तयार करणे, तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था करणे, कारखान्यात तरुणांना कामशिकवणे व रोजगार देणे, सेवा योजन कार्यालयाची स्थापना करणे, कामाचे तास ठरवणे, वेतनमान ठरवणे, औद्योगिक कामगारांना भरपगारी रजा देणे, अशा अनेक तरतुदी केल्या. मानवाच्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा. यांची पूर्ती करण्यासाठी कामगार वर्ग काम करीत असतो. कुटुंब प्रमुख या नात्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घरातील कर्तव्यावर अवलंबून असते.सर्व साधारण कामगार हा काम करणारा, अकुशल संघटीत अत्यंत खालच्या दर्जाची कामे करणार, फक्त अर्थाजन प्राप्तीसाठी श्रमकरणारा वर्ग आहे.

- कामगार आपल्या निढळाच्या घामाने उत्पादन वाढवितो, अतिरिक्त धन मिळवून देतो. परंतु ह्या अतिरिक्त धनावर त्या कामगारांचा कोणताही अधिकार राहत नाही. - अतिरिक्त धन केवळ मालकच बळकावून बसले. अतिरिक्त धनावर राज्याचाच अधिकार असावा. आणि हे राज्य सुद्धा कामगारांचे असावे. - सगळया जमिनी राज्याच्याच मालकीचे असावेत. सर्व उद्योग धंद्यावर केवळ राज्यांचाच अधिकार असावा. - डॉ. बाबसाहेब आंबेडकर म्हणतात की, शेतीचे यांत्रिकीकरण झाले पाहिजे शेतीच्या लहान तुकड्याचा समावेश मोठ्या तुकड्यात झाला पाहिजे. ग्रामोद्योग सुरु करावे. विजेचा ग्रामीण भाग पर्यंत विस्तार व्हावा, नद्यांना पाटबंधारे घालून ओलिताची व्यवस्था करावी. - शेत कामगारांनी संतती नियमच देखील अवलंब करावा. या विचारला आधारभूत धरून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाने ६ जानेवारी १९९० रोजी शिवाजी पार्क, मुंबई येथे जाहीरनामा काढला. त्यामध्ये गायरान, जंगल, जमिनी भूमिहीन शेत कामगारांना देणे. भूमी हिनांना पाण्याचे समान वाटप करणे. शेतकरी, शेतमजूर, अशिक्षित, असहाय्य व पैश्याचे दृष्टीने लाचार असल्यामुळे त्याचा गैरफायदा. खोत घेत होते. हि खोत पद्धत रद्ध करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी विषयक मांडून कायदा केला. कामगारांना व कारागिरांना आपल्या व्यवसायात प्राविण्य मिळवण्यात स्वतःची उत्पादकता वाढविण्यास व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम पक्षांनी राबविला. तसेच महिला सक्षमीकरण घडवून आणले. - दलित कष्टकरी समाज गुलामासारखा राबवू नये म्हणून लोकशाही मतावर आधारित असणारा स्वतंत्र कामगार पक्ष स्थापन केला. श्रमिक वर्गाच्या हितासाठी सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी लढा दिला होता. - बाबसाहेब १५ सप्टेंबर १९३८ मध्ये हे ५ डीस्प्युट बिलाचे माहिती सरकारपुढे ठेवतांना म्हणतात की, कामगार हा समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्यामुळे गरीबी, आर्थिक शोषण, अज्ञान, निरीक्षरता, कर्जबाजारीपणा, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा, आरोग्य विषयक समस्या, कामाच्या ठिकाणची दोष पूर्ण स्थिती, दैववादी प्रवृत्ती, संघटीत होण्या विषयीची उदासीनता. म्हणून कामगार कल्याण साधण्यासाठी कायदे करून मार्ग शोधला. - कामगारांच्या नुकसान भरपाईची कायदा १८२३ वेतन प्रदान अधिनियम १९३६ दि बॉम्बे इंडस्ट्रीयल रिलेशन्स ॲक्ट १९४६ औद्योगिक कलह कायदा १९४८ कामगार राज्य विमा कायदा – १९४८ कामगार प्रोव्हीदंट फंड कायदा – १९६१ कंत्राटी कामगार नियमन व निर्मुलन कायदा – १९६१ दि पेमेंट ऑफ ग्रॅज्युटीज ॲक्ट – १९७२ राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना राहणीमानाचा दर्जा सुधारणा १९४२ साली शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या अधिवेशनात २० हजार कामगारांना बाबासाहेबांनी आवाहन केले की, स्वच्छ रहा, दुर्गुणांपासून दूर राहा, तुमच्या मुलांना चांगले शिक्षण द्या, त्यांच्यातली कमी पणाची भावना दूर करा,

तुम्ही तर घरच्या साक्षात लक्ष्मी ..! त्यामुळे घरात काही अमंगल गोष्ट होणार नाही याची खबरदारी तुम्हाला घ्यायची आहे. सदाचरणा शिवाय घेतलेल्या शिक्षणाची किंमत शून्य असून चारित्र्य हेच धर्माचे महत्वाचे अंग आहे हे लक्षात घ्या. स्वतःचा पोशाख पांढरा शुभ्र नीटनेटका आणि महिलांनी सुद्धा पायघोळ साडी संपूर्णतः शरीर झाकलेले असा पोशाख शिवाय गळ्यात सोन्याचा दागीना असलेली काळी पोथ असा पेहराव असावा. शहर हे रोजगार निर्मितीची केंद्र आहे. खेड्यातून बाहेर पडा आणि शहराकडे धाव घ्या ! याचा अर्थ कामगारांचे सक्षमीकरण हि खेड्यात होत नसून शहरात घडून येते. समानता की समभाग बाबासाहेबांनी उद्योगात कामगारांच्या समान भागीदारीची मागणी केली.

शैक्षणिक सक्षमीकरण -

शिक्षणाने मनुष्य सुसंस्कृत बनतो परंतु शोषित, पिडीत कामगार वर्गामध्ये शिक्षण नसल्यामुळे ते अज्ञानी निरक्षर राहिले त्यामुळे श्रमिकांची संख्या वाढली. किमान वेतन कायदा १९४८ उपासमारीने शरीराचे शोषण कमी झाल्यास माणूस हतबल होवून अल्पायुषी होतो. शिवाय शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो. अर्थात मुलांच्या शरीराची व बुद्धीची शक्य तेवढी चांगली जोपासना करणे हे प्रत्येक आई बापाचे कर्तव्य आहे. म्हणून कामगारांचा विकास व्हावा ह्या हेतूने ०९/०३/१९२४ मध्ये दामोदर हॉल मध्ये सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकांना Educate, Agitate and Organise, शिकवा, चेतवा (संघर्ष) व संघटीत करा. असा मोलाचा संदेश देतात.

कौटुंबिक सक्षमीकरण -

मानवाच्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र आणि निवारा आहेत. त्याच प्रमाणे व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शिक्षण हे आवश्यक आहे. कुटुंबामध्ये एक व्यक्ती साक्षर असली तर संपूर्ण कुटुंबाचे भवितव्य प्रकाशमय होते. कुटुंबाचे सक्षमीकरणा मध्ये अर्थाजन म्हत्वाचे असते. अर्थाजनाची उपलब्धी रोजगारातून होते. पर्यायाने कुटुंबातील सर्व प्रौढ व्यक्ती कमावती असल्यामुळे एकमेकांविषयी जिव्हाळा, प्रेम, आपुलकी निर्माण होते. व गरजांची पूर्ती होण्यास मदत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १२ व १३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाड येथे दलित वर्ग कर्मचारी परिषदेत म्हटले होते की, ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत. दलित कष्टकरी समाज गुलामा सारखा राबवू नये असा जाहीरनामा इंग्रजी दैनिकात (Times of India) सामान्य जनतेसाठी, कष्टकरी वर्गासाठी, स्वाभिमानासाठी प्रकाशित केला. सरकारला स्वतःचे पक्षाचे मत ठेवतांना म्हणतात की, कामगार हा समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्याने समस्या ग्रस्त आहे. त्यांना दैववादी प्रवृत्तीतून बाहेर काढण्यासाठी, वैज्ञानीक दृष्टीकोन जोपासण्यासाठी स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी कामगाराचे कल्याण साधण्याचा मार्ग म्हणून कायद्याची तरतूद केली. कारखाना व उद्योगधंदे यामध्ये लैंगिक शोषणाच्या घटना घडतात गरीब लोक भीती पोटी अन्याय अत्याचार सहन करतात यातून बाहेर पडण्यासाठी व जीवनस्तर उंचावण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी - कलम ३५४ क - लज्जा भंग, ३७६ - बलात्कार, ४८९ क हि कलमे

जनतेच्या संरक्षणासाठी अंतर्भूत केली आहे. तसेच बालकामगार म्हणून १४ वर्षाच्या आतील मुलांना कारखाने, खाणी, किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे. (कलम-२४). कामगारांना कामगाराला कामाच्या ठिकाणी काम करतांना कायमचे अपंगत्व अथवा मृत्यू आल्यास कुटुंबीयावर उपासमार, निराधार होण्याची वेळ येवू शकते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारला अश्या वेळी १९२३ मध्ये कायद्याने नुकसान भरपाई देऊन आर्थिक व मानसिक संरक्षण प्रदान केले. आर्थिक सक्षमीकरणा संबंधी बाबसाहेब म्हणतात की, राष्ट्रातील संपत्तीचा उपयोग दरिद्री व गरीब निर्मुलनास व्हावा तसेच शेती हा राज्याचा प्रमुख उद्योग मानला जावा यासाठी उद्योगधंदे वाढले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२६ ला अस्पृश्यांना खादी विणणे व विकणे स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग सुचवितात. १९३८ मध्ये कोकण औद्योगिक कलह विधेयकानुसार कामगारांचा संप करण्याचा अधिकार हिरावून घेतला होता. याच वेळी बाबासाहेबांनी मुंबई विधीमंडळामध्ये या बिलावर भाषण करतांना "संप हा दिवाणी अपराध आहे, फौजदारी गुन्हा नव्हे" असे मत मांडले. व पुढे कामगारांना संप करण्याचा कायदेशीर अधिकार मिळवून दिला. बाबसाहेब "इंडियन माईन्स (अमेंडमेन्ट) ऑर्डीनंस १९४५" हा कायदा लागू करून स्त्री कामगाराच्या बाळासाठी छोट्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघराची व्यवस्था करण्याचे बंधन संबंधित व्यवस्थापनावर मांडण्यात आले. १९४५ मध्ये देशात ज्या प्रमाणत महागाई वाढते त्यांच्या निर्देशांकानुसार महागाई भत्ता वाढला पाहिजे तरच त्यांना योग्य न्याय मिळायला पाहिजे. हि भूमिका सरकारला मान्य करून सर्व जातीतील लोकांना महागाई भत्याचा लाभ मिळवून दिला. तशी तरतूद कायद्या मध्ये करून घेतली.

**सारांश**

भारतातील कामगार, कष्टकरी, शेतकरी, मजूर व स्त्रिया यांचे होत असणारे शोषण याकडे बाबासाहेबांच विशेष लक्ष होत. ते थांबल पाहिजे यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब केला स्त्रियांना प्रगतीच आकाश खुल करून दिल. कामगार कोणत्याही जातीधर्माचा असो त्याचं शोषण थांबवून त्यांना हक्क व अधिकार मिळालेच पाहिजे यासाठी आहोरात्र जीवाची पर्वा न करता जनतेच्या भल्यासाठी रणांगणात उतरला. व संवैधानिक मार्गाने लढा दिला. कामगारांना दिवसभरात केवळ ८ तासाचे काम असावे त्यापेक्षा अधिक काम केल्यास हा ओव्हर टाईम म्हणून निश्चित झाला. १२-१५-१८ तासावरून ८ तास करणारे कामगाराचे तारणहार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अजरामर आहे. १९१८ साली शेतीच्या समस्या व उपाय सांगणारे “Small Holding in India and their remidies” या पुस्तकातून सरकारला आवाहन करतात की, शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य बाजारभाव, हमी भाव मिळावा, शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, शेतकरी उद्योजक म्हणून अर्थ व्यवस्थेत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा कामगार विशयक दृष्टीकोन होता. डॉ. बाबसाहेब आंबेडकर भारताचे पहिले पाठबंधारे आणि उर्जा मंत्री म्हणून काम करतांना १५ मे १९५० रोजी खोतीपद्धत निर्मुलन अधिनियम लागू केला. या अधिनियमामुळे १,२२,८६० एक्कर जमीन या खोत, इनामदार यांच्या तावडीतून मुक्तकरून शेतकऱ्यांना मिळवून दिली. तसेच नद्याजोड प्रकल्पा अंतर्गत शेतीला सिंचनाचे क्षेत्र उपलब्ध करून दिले. म्हणून भारतातील जलधोरणाचा पाया घालणारे 'खरे जलनायक' डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संप, मोर्चे, व आंदोलने यातून कामगारांना न्याय मिळवून देतात. कामगारांच्या परिवाराची काळजी करणारे बालसंगोपन रजेपासून तर प्रसूतीरजा भर पगारी सुट्या मिळवून देणारा - अख्या बहिणींची काळजी घेणारा समस्त स्त्रियांचं जग बदलणारा प्रत्येक ताईंचा लाडका भाऊ विश्वरत्न म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत.